श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.
पोष्टः शिर्डी -४२३ १०९,
तालुकाः राहाता, जिल्हाः अहमदनगर.
दुरध्वनी प्रकाशने विभागः- ०२४२३-२५८८००,२५८८०८
फॅक्स क्रमांकः- ०२४२३-२५८८७०
वेबसाईटः- www.sai.org.in
ई-मेल saibaba@sai.org.in, publication@sai.org.in,publication.sssts@gmail.com
मुंबई कार्यालय पत्ता
साई निकेतन,८०४ बी.डॉ.आंबेडकर रोड,
दादर, मुंबई ४०० ०१४, टेलीफोन- ०२२-२४१६६५५६.

# निविदा प्रपत्र



## प्रकाशने विभाग

प्रकाशने विभागासाठी सन २०२१ ची श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईकाम करून पुरवठा करण्याची ई-निविदा .

**A. निविदेचा तपशिल- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे प्रकाशने विभागासाठी सन-२०२१ ची श्री साई दैनंदिनी, दिनदर्शिका छपाई करून पुरवठा करण्याची निविदा...**

**B. ई-निविदेसोबत सादर करावयाची कागदपत्रे, आर्थिक उलाढालीचे निकष वगैरे तपशील खालीलप्रमाणे-**

१. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने अद्ययावत प्रेस नोंदणी दाखला, तत्सम शासकीय परवाना ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

२. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने GST नोंदणी दाखला अगर GST Registration Receipt ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

३. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने अथवा मालकाचे नावाने पॅन कार्ड ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

४. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या फर्मची सन—२०१६-१७, २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० या आर्थिक वर्षाची सरासरी वार्षिक उलाढाल दिलेल्या नमुन्याप्रमाणे सी.ए. यांचे प्रमाणपत्रासह ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

५. निविदाधारकाची वरील नमूद ४ पैकी ३ आर्थिक वर्षाची किमान वार्षिक सरासरी उलाढाल रक्कम रू.५ कोटी असणे अनिवार्य राहिल.

६. ई-निविदाधारकांने हार्ड बॉन्ड पुस्तकांची मागील ५ वर्षात किमान रू.१० लाख किंमतीची छपाईकामे केलेल्या कार्यादेशाच्या प्रती Online ई-निविदेसोबत जोडणे अनिवार्य राहिल.

७. कोणत्याही संस्थेत आपले फर्मचे नांव काळया यादीत समावेश केले नसलेबाबत स्वयं प्रमाणपत्र (Self declaration) सादर करणे अनिवार्य आहे.

**C. निविदाधारकाने श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिकांचे नमूने सादर करण्याची पध्दत-**

१. निविदाधारकाने निविदा भरलेल्या श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिकांचे नमूने कापडी पिशवीमध्ये सिलबंद करून भरलेल्या साहित्याची यादी व नमूने संस्थानच्या प्रकाशने विभागामध्ये दि.३.०१.२०२१ व ४.०१.२०२१ रोजी कार्यालयीन वेळेत जमा करणे अनिवार्य राहील. कापडी पिशवीवर दैनंदिनी / दिनदर्शिका तसेच आपले फर्मचे नांव लिहीलेले असावे. दिलेले नमूने कोण्त्याही सबबीवर परत केले जाणार नाहीत अगर बदलता येणार नाहीत.

२. एका दैनंदिनी / दिनदर्शिकेसाठी उच्चत्तम दर्जाचा एकच नमूना सादर करावा. एका दैनंदिनी / दिनदर्शिकेसाठी दोन किंवा अधिक नमूने सादर करू नयेत. तसे केल्यास एकाच नमून्याचा विचार केला जाईल.

३. निविदा भरलेल्या दैनंदिनी / दिनदर्शिकेची यादी नमूने सादर करतांना सोबत सादर करणे आवश्यक आहे.

४. निविदाधारकाने दैनंदिनी/दिनदर्शिकेचे नमूने देतांना नमूना निवडीसाठी असे नमूने दयावेत की, पुरवठा आदेश मिळालेनंतर त्याच नमून्याच्या दैनंदिनी / दिनदर्शिकेचा संस्थानला पुरवठा होईल.

**D. पुरवठा करावयाच्या साहित्याचा तपशिल, निविदा फी व बयाणा रक्कम-**

१. पुरवठा करावयाचे साहित्याचा तपशिल BOQ मध्ये दिलेला आहे. त्यात ऑनलाईन दर नमूद करून निविदा ऑनलाईन भरावयाची आहे.

२. निविदा फी रक्कम रू.११,०००/- व बयाणा रक्कम रू.२,००,०००/- मात्र www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन भरावी.

**E. निविदाधारकांसाठी सूचना-**

१. सदर निविदा दि.२१/१२/२०२० रोजी सकाळी ११.०० वा.पासून दि.०२/०१/२०२१ सायं. ५.०० वाजेपर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Downloading व Uploading साठी उपलब्ध राहील.

२. ई-निविदेसोबत फक्त Online कागदपत्रे सादर करावयाची आहेत. Hard Copy मध्ये कागदपत्रे सादर करू नयेत. Hard Copy मध्ये सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही.

३. ई-निविदेसाठी Pre-Bid मिटींग दि.२४/१२/२०२० रोजी शिर्डी येथे आयोजित करणेत येईल.

४. शक्य झाल्यास दि.०५/०१/२०२१ रोजी Technical Bid उघडण्यात येईल. निविदेसोबत Online सादर केलेली

कागदपत्रे मागणीप्रमाणे असल्यासच Commercial Bid उघडणेत येईल अन्यथा निविदा विचारात घेतली जाणार नाही.

५. Commercial Bid उघडणेचे दिवशी आपण किंवा आपले प्रतिनिधी उपस्थित राहणे आवश्यक आहे. ऑनलाईन निविदा सादर करतांना निविदाकारकांनी आपले फोन नंबर्स ऑनलाईन निविदेमध्ये सादर करावेत म्हणजे पात्र ठरणा-या निविदाधारकांना Commercial Bid उघडणेची तारीख व वेळ कळविता येईल.

६. छपाई करावयाच्या श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिकांचा तपशिल ( Specification, कागदाचा प्रकार, नग/संख्या वगैरे) BOQ मध्ये नमूद केलेला आहे. निविदाधारकाने सर्वच पर्यायांचा अभ्यास करून BOQ मध्ये दर भरावेत.

**F. निविदेत ऑनलाईन दर भरतांना सर्व कर व खर्चासह दर नमूद करणे-**

१. निविदेमध्ये ऑनलाईन दर भरतांना GST, TDS, GST TDS अगर इतर कुठलाही शासकीय कर, लेबर चार्जेस, पॅकींग व फॉरवर्डींग खर्च, जकात, वाराई वगैरे सर्व खर्चासह शिर्डी संस्थानचे भांडार/प्रकाशने विभागामध्ये पोहोच करणेचा वाहतूक खर्च या सर्व बाबींचा विचार करूनच दर भरावेत.

२. शासन नियमानुसार सध्या लागू असणारे व वेळोवेळी लागू होणारे कर पुरवठाधारकावर बंधनकारक राहतील व त्याप्रमाणे रक्कम बीलातून कपात करण्यात येईल. शासनाने १ ऑक्टोबर २०१८ पासून करपात्र वस्तु/सेवा अथवा दोन्हीसाठी पुरवठादाराला करावयाचे प्रदानातून २% TDS वजा करणेबाबत परिपत्रक क्र.२०१८०९२८१७१४३६६६०५ अन्वये निर्देशित केले आहे. त्याचाही निविदा भरतांना निविदाधारकाने विचार करावा. याबाबतची अधिक माहिती महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

G. **ऑनलाईन निविदा उघडण्याची व नमूने निवडण्याची कार्यपध्दती-**

१. निविदेचा डाऊनलोड कालावधी संपल्यानंतर खरेदी समितीच्या सभेत ऑनलाईन तांत्रिक ई-निविदा प्रथम उघडणेत येतील. त्यानंतर तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकांनी सादर केलेल्या दैनंदिनी व दिनदर्शिकेचे नमूने खरेदी/तज्ञ समितीमार्फत निवडण्यात येतील. सादर करणेत आलेला नमूना actual Specification प्रमाणे printing नसेल तर सदर निवीदाधारक तांत्रिक निविदेमध्ये अपात्र ठरविण्यात येईल.

२. पात्र ठरणा-या निविदाधारकांचेच कमर्शिअल बीड उघडणेत येईल.

३. पात्र ठरलेल्या निविदाधारकांच्या त्या-त्या दैनंदिनी/दिनदर्शिकेच्या दरांचा तुलनात्मकदृष्टया विचार करण्यात येईल व यामध्ये न्युनतम दरधारकांशी चर्चा व वाटाघाटी करण्यात येतील व त्यानुसार अंतिम निर्णय घेतला जाईल.

**H. छपाई कामाच्या महत्वाच्या सूचना-**

१. कार्यादेशाप्रमाणे छपाई करणेचे काम सुरु केलेनंतर प्रथम प्रुफ १५ दिवसात तयार करुन तो प्रकाशने विभागाकडून तपासून घेऊन व अंतिम प्रुफ मान्य झालेनंतर पुढील छपाई करणेचे काम सुरू करावे. प्रुफ मान्य करून न घेतलेली छपाई स्विकारली जाणार नाही.

२. कार्यादेशाप्रमाणे छपाईचे काम पुर्ण झाल्याशिवाय आपली जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम परत केली जाणार नाही.

३. श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका छपाई करणेपुर्वी ०५ नग डमी (नमूना) पहाणी / तपासणीकामी इकडील कार्यालयाकडे पाठविणे बंधनकारक राहील. कार्यालयाकडून नमूना तपासून मान्य केल्यानंतर पुढील छपाई/निर्मिती चालू करावी. आपणांस मान्य केलेल्या कागदावरच पहिल्या लॉटपासून शेवटच्या लॉटपर्यंत श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका छपाई करावी लागेल. इतर कोणत्याही कागदावर छपाई करू नये. मान्य केलेल्या कागदाव्यतिरिक्त छपाई केल्यास आपली अनामत रक्कम व देयकाची रक्कम संस्थान खाते जमा (जप्त) करण्यात येईल. तसेच कराराच्या भंगाबाबत उचित कारवाई करण्यात येईल.

४. श्री साई दैनंदिनी छपाईकामी संस्थानकडून पुरविण्यात आलेली सी.डी.ही फक्त संस्थानच्या श्री साई दैनंदिनी छपाई कामी वापरावी. तिचा दुरूपयोग करून संस्थान व्यतिरिक्त इतर कोणास छपाईकामी दिल्याचे आढळल्यास कॉपी राईटस् ॲक्ट अंतर्गत तसेच कराराच्या भंगाबाबत कारवाई करण्यात येईल.

**I. साहित्य पुरवठा करावयाचे ठिकाण-**

१. निविदेत नमूद केलेल्या श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिकांचा पुरवठा शिर्डी येथील संस्थानचे श्री साई मंदिराचे जवळील प्रकाशने विभागाचे सबस्टोअरमध्ये अगर रिंग रोडवरील संस्थानच्या गोडावूनमध्ये करावा लागेल. प्रसंगी प्रकाशने विभागाचे सूचनेप्रमाणे संस्थान परिसरातील इतर ठिकाणीही पुरवठा करावा लागेल.

**J. सुरक्षा अनामत रक्कम व करारनामा-**

१. ज्यांच्या निविदा मंजूर होतील त्यांना विहीत मुदतीत श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिकांचा पुरवठा करावयाची हमी म्हणून मंजूर साहित्याचे पुरवठा आदेशाच्या एकूण रकमेच्या ३ % इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून ठेवावी लागेल. निविदा मंजूर झाल्याचे कळविलेनंतर त्वरीत सदर रकमेचा भरणा करावा लागेल. ही सुरक्षा अनामत रक्कम व्यवस्थितरित्या श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिकांचा पुरवठा पूर्ण केलेनंतर परत केली जाईल. सुरक्षा अनामत अगर बयाणा रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

२. निविदा मंजूर झालेनंतर ३ % सुरक्षा अनामत रक्कम त्वरीत डी.डी./ रोखीने / आरटीजीएस द्वारे संस्थानच्या बॅंक खातेवर जमा करावी लागेल. तसेच शिर्डी येथे समक्ष येऊन रू.६००/- चे स्टॅम्प पेपरवर त्वरीत करारनामा नोटरी करून देणे बंधनकारक राहील. करारनाम्याची नोटरी फी निविदाधारकांस आदा करावी लागेल.

**K. श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका पुरवठा करण्याचे वेळापत्रक-**

१. श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिकांचा पुरवठा सुरू करणेपूर्वी प्रथम प्रुफ (ज्यामध्ये आपणांस दिलेल्या Hard and Soft Copy छपाईचा नमूनाबरहुकूम आहे की नाही याची) तपासणी करून घ्यावयाचा आहे. अंतिम प्रुफ आपणांस तपासून दिलेनंतर विनाविलंब विभागाचे मागणीनुसार छपाई कामाचा पुरवठा पूर्ण करावा लागेल. सदर मुदतीनंतर पुरवठा केल्यास दंडात्मक कारवाई केली जाईल किंवा विलंब झाल्यास प्रसंगी इतर प्रेसधारकाकडून छपाई करून घेण्यात येईल. त्यासाठी येणारा जादा खर्च आपल्या बीलातून अथवा सुरक्षा अनामत रकमेतून वसूल करण्यात येईल.

२. श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका पुरविलेचा आदेश दिल्यानंतर प्रकाशने विभागाचे सूचनेप्रमाणे पुरवठा करावा लागेल.

३. संस्थानची सदर मागणी ही अंदाजीत असल्यामुळे पुरवठा कालावधीत अगर त्यानंतरही गरजेनुसार मंजूर केलेल्या परिमाणापेक्षा २५ % पर्यंत श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिकांची आयटेमवाईज मागणी संस्थानकडून झाल्यास श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिकांचा पुरवठा मान्य दरानेच करणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील.

**L. श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका स्वीकार करण्याची पध्दत-**

१. पुरवठा आदेशातील वर्णनाप्रमाणे श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिकांचा पुरवठा करावा व त्याप्रमाणेच श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिकांचे बील सादर करावे.

२. ज्या नमुन्याचे श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिकांच्या निविदा मंजूर होतील त्या सर्व मान्य झालेल्या दर्जा व नमुन्याप्रमाणे पुरवाव्या लागतील. कमी दर्जाच्या अगर वेगळया प्रकारची श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका स्वीकारल्या जाणार नाहीत. अशा प्रकारची श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका पुरवठा झाल्यास ते स्वखर्चाने तात्काळ परत घेवून जाणे पुरवठाधारकांस बंधनकारक राहील ते न नेल्यास, त्याची नासधूस झाल्यास त्यास संस्थान जबाबदार राहणार नाही.

३. पुरवठा करीत असलेली श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिकांची Quantity जास्त असल्यामुळे, संस्थानकडून Randomly Sample पाहून सदरील साहित्य स्विकारले जाते. तथापि श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका स्विकालेनंतरही एखादा लॉट अगर त्यातील काही साहित्य खराब आढळल्यास संपूर्ण लॉट किंवा पुरवठाधारकांशी करारच रद्द करण्याचे अधिकार संस्थान राखून ठेवत आहे.

४. श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका पुरवितांना पॅकींगचे बॉक्स BOQ मध्ये कळविलेप्रमाणे नगांचे पॅकींग असावे.

५. पुरवठा आदेशातील पुरवठा केलेली श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका कमी प्रतीच्या आढळल्यास / मान्य दर्जाचे नसल्यास कराराच्या अटी/शर्तीचा भंग केल्याची दंडात्मक कारवाई करण्याचा किंवा संपूर्ण करारच रद्द करण्याचा हक्क संस्थान राखून ठेवत आहे.

६. प्रेसधारकाने प्रत्येकवेळी साहित्याचा पुरवठा करतांना Specification मध्ये कळविलेप्रमाणे कागदाच्या GSM बाबतचा शासकीय / शासनमान्यता प्राप्त प्रयोगशाळेचा पडताळणी अहवाल सादर करणे बंधनकारक राहील.

७. पुरवठाधारकाला पुरवठा आदेश दिल्यानंतर संस्थानच्या तज्ञ समितीने निवडलेल्या नमुन्याप्रमाणेच माल पुरविणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील.

८. पुरवठाधारकाला पुरवठा आदेश दिल्यानंतर संस्थानच्या तज्ञ समितीने निवडलेल्या नमुन्याप्रमाणेच माल पुरविणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील.

**M. लॅब तपासणीची कार्यपध्दती-**

१. छपाई कामासाठी निविदेत नमूद केलेला GSM चा कागद वापरलेला नसल्यास दंडात्मक कारवाई केली जाईल प्रसंगी करार रद्द करणेचा अधिकार संस्थान राखून ठेवत आहे.

२. श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईकामी निविदेत नमूद केलेप्रमाणे मटेरियल वापरणेत यावेत.

**N. बील आदा करण्याची पध्दत-**

१. पुरविलेल्या श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिकांचे बील व त्याचा दर्जा व नग संख्या योग्य असल्याची खात्री झाल्यावरच आदा करणेत येईल. सदर पुरवठयापोटी आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

२. छपाई कामाचे देयक सादर करतांना देयकात कार्यादेशातील मजकूराप्रमाणेच तपशिल असणे आवश्यक आहे. संक्षिप्त स्वरूपात उल्लेख करू नये, त्यामुळे देयक आदा करणेस विलंब झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित पुरवठाधारकावर राहील.

३. श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिकांची तपासणी करून ताब्यात घेतलेल्या साहित्याचे बील संस्थानकडे सादर केलेपासून ३० दिवसाचे आंत संबंधित पुरवठाधारकाला आदा करण्याचा प्रयत्न राहील.

४. पुरवठाधारकाने पुरविलेली श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका मान्य दर्जाचे नसल्याचे कारणावरून संस्थानने नाकारल्यास संस्थानला बाजारभावाने दुसरीकडून सदरील साहित्य खरेदी करावे लागल्यास त्यासाठी जादा आलेल्या खर्चाची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतून अथवा संस्थानकडून देय असलेल्या इतर मालाच्या बीलातून वसूल केली जाईल तसेच या कारवाई व्यतिरिक्त दंडात्मक कारवाई केली जाईल, प्रसंगी करार रद्द करणेचा अधिकार संस्थान राखून ठेवत आहे.

५. शासन नियमानुसार सध्या लागू असलेल्या व वेळोवेळी लागू होणा-या कर कपाती बिलातून करण्यात येतील.

**O. आपत्ती/नैसर्गिक आपत्ती, नुकसान भरपाई व दंडात्मक कारवाईबाबतची तरतुद:-**

१. पुरवठा आदेशातील श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका मुदतीत पुरविले नाही तर खालीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करणेत येईल. प्रसंगी करार रद्द करण्याचा अधिकार संस्थानने राखून ठेवत आहे.

| | |
|---|---|
| अ) पुरवठा न केलेल्या साहित्याची किंमत रू.२.०० लाखापेक्षा कमी असल्यास .. | मंजूर साहित्यापैकी पुरवठा न केलेल्या शिल्लक साहित्याच्या छपाई किंमतीच्या प्रती आठवडा ०.५० % दराने जास्तीत जास्त १० % पर्यंत. |
| ब) पुरवठा न केलेल्या साहित्याची किंमत रू.२.०० लाख किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास.. | मंजूर साहित्यापैकी पुरवठा न केलेल्या शिल्लक साहित्याच्या छपाई किंमतीच्या प्रती आठवडा ०.५० % दराने जास्तीत जास्त ५ % पर्यंत. |

२. श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका पुरविणेचा आदेश दिलेनंतर श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिकांचा पुरवठा वेळेवर न झाल्यास, अगर योग्य प्रतीचे नसल्यामुळे श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका नाकारले गेल्यास संस्थानची अडचण होऊ नये म्हणून, संस्थान बाजार भावाने आवश्यक तितके किंवा दिलेल्या आदेशाइतक्या श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका दुसरीकडून खरेदी करण्याची मुभा राहील. अशी खरेदी केलेली श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका साठी जादा लागलेल्या रकमेची (फरकाची) भरपाई निविदाधारकाने संस्थानला करून दयावयाची आहे. सदरची भरपाई सुरक्षा अनामत रक्कमेतून अगर पुर्वीच्या/नंतरच्या आलेल्या श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिकाचे बीलातून वसूल करण्याचा अधिकार संस्थानला राहील. तसेच दंडात्मक कारवाई प्रसंगी करार रद्द करण्याचा संस्थान राखून ठेवत आहे.

३. पुरवठादाराने मंजूर केलेले दराने व Specification मध्ये नमूद केलेप्रमाणे श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका यांचा पुरवठा करणे बंधनकारक आहे. मंजूर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ मागण्याचा अधिकार पुरवठाधारकास असणार नाही अथवा अशाप्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. पुरवठाधारकाने श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका यांचा पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा पुरवठा न केल्यास संस्थान बाजारभावाने अथवा फेरनिविदा मागणी करून श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका खरेदी करावी लागल्यास जादा येणा-या खर्चाची नुकसान भरपाई पुरवठाधारकाकडून वसूल केली जाईल. तसेच दंडात्मक कारवाईप्रसंगी करार रद्द करणेचा अधिकार संस्थान राखून ठेवत आहे.

४. निविदा पुरवठा कालावधीमध्ये एखादी आपत्ती / नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी पुरवठाधारकाच्या नियंत्रणाबाहेर युध्द, अपहरण, घातपात, रोगराई,संप,स्फोट,टाळेबंदी,भूकंप वगैरे) पुरवठाधारक श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका यांचा पुरवठा करू शकला नाही व तसे पुरवठाधारकाने त्वरीत लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थितीनुरूप घेण्यात येईल.

**P. निविदा वैधता कालावधी –**

१. सदर ई-निविदेचा वैधता कालावधी निविदा Online भरलेच्या अंतिम तारखेनंतर १२० दिवसांचा राहील.

**Q. सर्व साधारण अटी-शर्ती-**

१. Specification मधील मजकूर पाहून त्याप्रमाणेच साहित्याचे दर भरावेत. Specification मध्ये नमूद केलेल्या मटेरियल / कागदाशिवाय इतर दर देवू नयेत . त्याचा विचार केला जाणार नाही.

२. निविदाधारकाने Technical Bid मध्ये दिलेल्या छपाई माहितीसंदर्भात संस्थानचे अधिकारी प्रसंगी आपले उदयोगाच्या ठिकाणी भेट देऊ शकतील त्यावेळी संबंधितांना सहकार्य करून आवश्यक ती माहिती देणे बंधनकारक राहील.

३. निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रीयेमध्ये कोणत्याही टप्प्यावर निविदेतून माघार घेतल्यास त्यांची बयाणा रक्कम जप्त करणेत येईल.

४. पुरवठाधाराचे/संस्थेचे आवश्यकता वाटल्यास Vendor Audit केले जाईल.

५. यापुर्वी ज्या निविदाधारकाचे नांव ज्या कालावधीसाठी संस्थानने काळया यादीत ( black list) टाकलेले आहे, अशा निविदा तेवढया कालावधीसाठी विचारात घेतल्या जाणार नाहीत. तसेच ज्यांनी पुरवठा आदेश दिलेनंतर मागणीनुसार/अटी /शर्तीनुसार छपाईचा पुरवठा केलेला नाही, अशा पुरवठादारांच्या निविदा कारवाई केलेपासून ०३ वर्ष विचारात घेतल्या जाणार नाहीत. याकामी मुख्य कार्यकारी अधिकारी/ मा.तदर्थ समितीचे निर्णयाप्रमाणे उचित कार्यवाही करणेत येईल.

६. सदरील व्यवहाराबाबत वाद निर्माण झाल्यास तो राहाता/कोपरगांव कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.

७. निविदाधारकांच्या दरांचा तुलनात्मकदृष्टया विचार करणेत येईल व यामध्ये न्युनतम दरधारकांशी चर्चा व वाटाघाटीनंतर अंतिम निर्णय घेतला जाईल.

८. कोणतीही निविदा अंशतः /पूर्णतः स्विकारणे किंवा सर्व निविदा नाकारणेचा हक्क संस्थानने राखून ठेवलेला आहे.

९. सशर्त निविदा तात्काळ रद्द करणेत येईल. सदर निविदेतील नमूद अटी-शर्ती व अर्हता पूर्ण करू न शकलेल्या निविदाधारकांच्या निविदा रद्द करण्यात येतील.

१०. छपाईकामी अग्रीम रक्कम (ॲडव्हान्स) दिली जाणार नाही.

११. प्रेसधारकांना श्री साई दैनंदिनी छपाईकामी मजकूराची सी.डी. पुरविण्यात येईल. त्यानुसार छपाईचे काम व डिझाईनिंगची सर्व कामे स्वखर्चाने करावयाची आहेत.

१२. संस्थानने निविदा काढलेल्या श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिकांचे ई-निविदेच्या Specification प्रमाणे मागील वर्षीचे नमूने संस्थानने प्रकाशने विभागामध्ये पहावयास मिळतील. निविदाधारकांस रविवारखेरीज कार्यालयीन सकाळी १० ते ६ या वेळेत नमूना पाहता येईल. निविदाधारकांनी नमूने पाहून / व्यवस्थित माहिती घेवूनच दर भरावेत.

१३. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणे वा जादा अटी/शर्ती विहीत करण्याचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. निविदाधारकाची कोणतीही अट/अटी संस्थानवर बंधनकारक राहणार नाही, अशा निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

१४. ई-निविदा सूचनेच्या जाहिरातीत शक्य झाल्यास तांत्रिक निविदा दि.०४.०१.०२०२१ रोजी येईल असे नमूद केले होते तथापि आता त्या दि.५/०१/२०२१ रोजी उघडण्यात येतील.(शक्य झाल्यास)

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

**निविदाधारकाबाबतची माहिती**

| | | |
|---|---|---|
| १. | फर्मचे नांव- | ------------------------------------------------------------------ |
| २. | पत्रव्यवहारासाठी संपुर्ण पत्ता- | ------------------------------------------------------------------ |
| ३. | दूरध्वनी क्रमांक- | ------------------------------------------------------------------ |
| | ऑफीस- | ------------------------------------------------------------------ |
| | दुकान- | ------------------------------------------------------------------ |
| | निवास- | ------------------------------------------------------------------ |
| | मोबाईल नंबर- | ------------------------------------------------------------------ |
| | फॅक्स नंबर- | ------------------------------------------------------------------ |
| | ई-मेल.. | ------------------------------------------------------------------ |
| ४. | संपर्कासाठी व्यक्तीचे नांव- | ------------------------------------------------------------------ |
| | दूरध्वनी/मोबाईल क्रमांक- | ------------------------------------------------------------------ |
| ५. | मालकाचे/भागिदारांची नांवे | १. ---------------------------------------------------------------- |
| | | २. ---------------------------------------------------------------- |
| ६. | बॅंक खाते नांव- | १. ---------------------------------------------------------------- |
| | शाखा- | २. ---------------------------------------------------------------- |
| | खाते नंबर व प्रकार | ३. ---------------------------------------------------------------- |
| | आयएफएससी कोड | ४. ---------------------------------------------------------------- |

दिनांकः-      /       /२०२१

ठिकाणः-

निविदाधारकाची सही व शिक्का

## निविदाधारकाबाबत तांत्रिक माहिती

१) प्रेसचा / कंपनीचा प्रचलीत भारतीय कायद्यानुसार नोंदणी क्र.

(Registration No.)

२) किती वर्षापासून व्यवसायात आहात ?

३) खाजगी मालकी किंवा कंपनी / भागीदार ?
( कंपनी / भागीदार असल्यास डीड सोबत जोडावे )

४) इमारत स्वमालकीची अगर भाडोत्री.

५) इमारतीचे क्षेत्रफळ

६) उपलब्ध ऑफसेट मशिनरीचा तपशिल

अ) दोन रंगात छपाई मशीन संख्या

ब) चार रंगात छपाई मशीन संख्या

७) स्वतःची सीटीपी / डीटीपी यंत्रणा आहे काय ?

८) स्वतःची फोटो लॅमिनेशनची यंत्रणा आहे काय ?

९) स्वतःची युव्ही यंत्रणा आहे काय ?

१०) स्वतःची पुस्तके शिलाई यंत्रणा आहे काय ?

११) किती भाषेत छपाई केली जाते.

# (चेक लिस्ट) मधील कागदपत्रे Technical Bid

१. अद्ययावत दुकान प्रेस /नोंदणी प्रमाणपत्र/दाखला

२. GST नोंदणी दाखला/GST Online Registration Acknowledgement

३. पॅन कार्ड

४. सन-२०१६-१७, २०१७-१८,२०१८-१९, २०१९-२० या ४ वर्षापैकी ३ वर्षाचे सरासरी वार्षिक उलाढालीबाबतचे चार्टर्ड अकाऊंटन्ट यांचे प्रमाणपत्र

५. कोणत्याही संस्थेत काळया यादीत नाव समाविष्ट नसलेबाबत स्वयंप्रमाणपत्र

६. कोणत्याही सरकारी निमसरकारी संस्थेत मागील ५ वर्षात हार्ड बॉन्ड पुस्तकांची किमान रूपये दहा लाखाची छपाईकामे केलेल्या कार्यादेशाच्या प्रती व पुरवठा चलन (Delivary challan) सोबत जोडणे अनिवार्य आहे.

७. ई-निविदेतील BOQ मधील Specification प्रमाणे नमूने सादर करणे अनिवार्य आहे.

**निविदाधारकाची सही व शिक्का**

प्रति,
मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
ता. राहाता, जि. अहमदनगर

**विषयः- सन २०२१ ची दैनंदिनी, दिनदर्शिका छपाई करुन पुरवठा करण्याबाबतची ई-निविदा.**

महोदय,

खालील सही करणार मी/ आम्ही कळवितो की, वरील विषयाबाबत आपण प्रसिध्द केलेली ई-निविदा वाचली. आपल्या निविदेत दिलेल्या सर्व अटी व शर्ती मी/ आम्ही वाचल्या असून मला/आम्हाला मान्य आहेत. आपले शर्ती/अटींचे पालन करावयाचे मी/ आम्ही मान्य करीत आहे/ आहोत.

मी/आम्ही आपणास निविदेत नमूद केलेल्या श्री साई दैनंदिनी व श्री साईबाबा दिनदर्शिकांचा आपल्या मागणीप्रमाणे उपरोक्त कालावधीकरिता संस्थानचे आवश्यकतेनुसार, आवश्यक त्यावेळी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे भांडार पोहोच करण्याची हमी देतो. सदर मालाची संख्या अंदाजे असल्यामुळे वेळप्रसंगी नमूद केलेल्या श्री साई दैनंदिनी व श्री साईबाबा दिनदर्शिका संख्येपेक्षा २५% पर्यंत जास्त श्री साई दैनंदिनी व श्री साईबाबा दिनदर्शिकांची जादा संस्थानतर्फे मागणी झाल्यास, मी/ आम्ही त्या मंजूर दराने पुरविण्याची हमी देत आहे/ आहोत

ज्या श्री साई दैनंदिनी व श्री साईबाबा दिनदर्शिकांची निविदा मंजूर होतील, त्या मंजूर दराने पुरवठा करण्याची हमी म्हणून, मंजूर पुरवठा आदेश एकुण रकमेच्या ३ % इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून निविदा मंजूर झाल्याचे कळविलेपासून १५ दिवसाचे आत मी/ आम्ही रोख, डी.डी. अथवा आरटीजीएस ने भरणा करु. याकरिता बयाणा रक्कम सुरक्षा अनामत खाती वर्ग करण्यास माझी संमती आहे. तसेच रु.६००/- चे स्टॅम्प पेपरवर करारनामा नोटरी करुन देऊ व त्याप्रमाणे मंजूर दराने निविदा कालावधीत नमुन्याप्रमाणे श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिकांचा वेळेत संस्थानचे प्रकाशने स्टोअर तसेच मध्यवर्ती भांडार विभागात पोहोच करणे आमच्यावर बंधनकारक राहील.

आपला विश्वासू

सही/ सह्या व शिक्का

फर्मचे / मालकाचे भागीदाराचे नावः-

१) २) ३)

**सोबत-** कागदपत्रे.

# वार्षिक उलाढालीबाबतचे प्रमाणपत्र

दाखला देण्यात येतो की, मे.------------------------------------------------------------ यांचे निविदेसंबंधीत व्यवसायाची सन—२०१६-१७, २०१७-१८, २०१८-१९, व २०१९-२० या आर्थिक वर्षाची उलाढाल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | वर्ष | वार्षिक उलाढाल |
|---|---|---|
| १ | सन-२०१६-१७ | |
| २ | सन-२०१७-१८ | |
| ३ | सन-२०१८-१९ | |
| ४ | सन-२०१९-२० | |
| ३ वर्षाची सरासरी उलाढाल | | |

लेखापरीक्षकाची सही/चार्टर्ड अकाऊंटंट
(नाव/सही शिक्का)
नोंदणी क्रमांक .

दिनांकः- / /२०२०
ठिकाणः-

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर , पिन क्र.४२३ १०९.
फोन नं.२५८५००/२५८८००/२५८८०८ , फॅक्स क्र.(०२४२३) २५८८७०
(Website- www.sai.org.in) E-mail- publication@sai.org.in, publication.sssts@gmail.com

---

## ई-निविदा सुचना

श्री साईबाबा संस्थानचे प्रकाशने विभागासाठी सन २०२१ ची श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका याकामी ऑनलाईन निविदा मुद्रणालयाकडून मागविणेत येत आहेत.

- निविदा किंमत रु .११,०००/- (रू.अकरा हजार मात्र)
- बयाणा रक्कम रू. २,००,०००/- (रू.दोन लाख मात्र)
- मागील ०३ आर्थिक वर्षात उलाढाल प्रति वर्ष किमान रु.०५ कोटी असावी व छपाई व्यवसायाचा किमान ०५ वर्षांचा अनुभव आवश्यक.

१) ई-निविदेच्या अटी व शर्ती शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.
२) निविदा ऑनलाईन डाऊनलोड व अपलोडींगसाठी दि.२१ / १२ /२०२० रोजी सकाळी ११.०० वाजेपासुन ते दि.०२/०१/२०२१ सायंकाळी १७.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहील.
३) निविदा फी व बयाणा रक्कम थेट www.mahatenders.gov.in ऑनलाईन जमा करावी.
४) निविदाकाराने सर्व कागदपत्रे ऑनलाईन स्कॅन करुन सादर करावयाचीआहे, *Hard Copy* मध्ये सादर केलेली कागदपत्रे विचारात घेतली जाणार नाहीत.
५) दैनंदिनी व दिनदर्शिकांचे नमुने शिर्डी कार्यालयाकडील प्रकाशने विभागात कार्यालयीन वेळेत पहाणेसाठी उपलब्ध आहेत. कृपया नमुने पाहुनच ई -निविदा भराव्यात.
६) शक्य झाल्यास तांत्रिक निविदा दि.०५/०१/२०२१ रोजी उघडण्यात येईल.
७) ई-निविदेसाठी Pre Bid सभा दि.२४/१२/२०२० रोजी शिर्डी येथे आयोजित करणेत येईल.

(कोणतीही निविदा अंशतः /पूर्णपणे स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा हक्क संस्थानने राखून ठेवलेला आहे.)

(कान्हुराज बगाटे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारीअधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी